**कृपया प्रसिद्धीसाठी** **०४.०५.१९**

**खडक पोलीस ठाणे,**
**पुणे शहर**

**महत्त्वाच्या कागदपत्रांची बॅग मूळ मालकास परत केली.**

पुण्यातील भवानी पेठेतील पालखी विठोबा चौक परिसरात ३० एप्रिल२०१९ रोजी युवराज वालचंद देवकुळे आणि सुनील गोवर्धन देवकुळे या दोन तरुणांना एक काळ्या रंगाची बॅग सापडली. त्यांनी ती बॅग लगेच खडक पोलीस ठाण्याच्या अखत्यारीतील रामोशीगेट पोलीस चौकी येथे येऊन काशेवाडी मार्शलचे कर्मचारी पोलीस नाईक गायकवाड (६५८३) आणि पोलीस नाईक माळी (५८५९) यांच्याकडे सुपूर्त केली. या पोलीस कर्मचाऱ्यांनी बॅग तपासल्यावर त्यात एटीएम कार्ड, बँकेचे पासबुक, हॉस्पिटलची फाईल अशी महत्त्वाची कागदपत्रे असल्याचे आढळले. तसेच कागदपत्रांवरील उल्लेखावरून बॅगेच्या मालकाचा नावपत्ताही समजला. त्यानुसार त्या पत्त्यावर चौकशी करून ती बॅग श्री. श्रीनिवास व्यंकटेश आडेप यांचीच असल्याची खात्री करून घेतली. त्यानुसार आडेप यांचा भाचा अमोल यांच्याकडे ती बॅग दिली. श्रीनिवास आडेप यांना दारू पिण्याचे व्यसन असून त्यांच्याकडून सदर बॅग गहाळ झाली असे अमोल यल्लम यांनी सांगितले. मागरिकांनी सावधानतेने वस्तू पोलीस ठाण्यात आणून दिल्याने व पोलिसांनी त्वरित शोध घेतल्याने महत्त्वाच्या कागदपत्रांची बॅग मालकास परत मिळाली.

**(राजेंद्र मोकाशी)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर